सं. फौ. ख. क्र.१८९/२०२३ **निशाणी क्र.१४**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,**

नाव – शर्मिला बलभीम कौचट,

वय – ३५ वर्षे, व्यवसाय – पो.ह.४९०

पत्ता – पोलीस ठाणे वडवणी.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. एस. बी. गिरी यांचेमार्फत सरतपास दु.१.०० वा. सुरुः**

**१.** दिनांक १०.१०.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन वडवणी येथे हजर होते. त्यादिवशी पो.ह. १३१७ माळी यांनी मला असे कळविले की, आपल्याला देवळा येथे रेड कामी जायचे आहे. एपीआय सिरसाट यांना आम्ही माहिती देवुन पोह.१३१७ माळी तसेय त्यांनी आणलेले दोन पंच आम्ही सर्वजण एका खाजगी वाहनाने मौजे देवळा, ता. वडवणी येथे गेलो होतो. देवळा गावातील शामराव सदाशिव जावळे यांच्या एका शेडजवळ आम्ही गेलो असता तेथे दारु पिणारे लोक आम्हाला पाहुन पळून गेले. शामराव जावळे हा व्यक्ती तेथेच सापड्यामुळे त्यांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातील एका वायरच्या पिशवीमध्ये देशी दारु बॉबी संत्रा कंपनीचे १८० मिली चे १२ नग मिळून आले. त्यापैकी एक नग सी. ए. परिक्षणाकरीता राखून ठेवला.

**२.** पो.ह. १३१७ माळी यांनी सदर जप्त मुद्देमालाचा पंचनामा त्याच ठिकाणी तयार केला. मुद्देमाल घेवुन आम्ही पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर पो.ह. १३१७ माळी यांनी शामराव जावळे या व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. बी. आंधळे यांच्यामार्फत**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, ज्या पत्र्याच्या शेड मध्ये आम्ही छापा घातला ती जागा कोणाच्या मालकीची आहे या विषयी कोणताही कागदोपत्री पुरावा मी स्वतः पाहिलेला नाही. त्या पत्र्याच्या शेडच्या आजुबाजुला कोणाची घरी किंवा जागा या विषयी मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये आरोपी विरुद्ध कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते अशी कोणतीही घटना

घडलेली नाही. हे म्हणणे खरे की, केवळ कोटा पुर्ण करण्याच्या उद्देशाने आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे की, आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास दु.१.०५ वा. पुर्ण**

फेरतपास नाही.

**दिनांकः– १७.११.२०२५**

| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
|---|---|
| sd/– | sd/– |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| वडवणी, जि. बीड. | वडवणी, जि. बीड. |